ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# भारताच्या शाश्वत विकासामध्ये पर्यटन व्यवसायाची भूमिका

**सौ.आरती अमित गोगवले[1], डॉ. रमेश सयाजी देसाई (मावची)[2]**

[1]सहशिक्षिका, कै.सौ.लक्ष्मीबाई राजाराम शिंदे हायस्कूल, अरण्येश्वर पुणे -9

[2]मार्गदर्शक, 'यशोदीप 'जिजाऊ सोसायटी, बिबवेवाडी कोंढवा रोड, पुणे. 411037

*Corresponding Author:* सौ.आरती अमित गोगवले

**DOI - 10.5281/zenodo.14875317**

**गोषवारा:**

*पर्यटन हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा उद्योग आहे. जगातील काही देशांची संपूर्ण अर्थव्यवस्था पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे. भारताची नैसर्गिक साधन संपत्ती, ऐतिहासिक वारसा स्थळे, आणि सांस्कृतिक विविधता हे कायमच पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरलेले आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाद्वारे 2024 मध्ये सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, 2023 मध्ये 9.24 दशलक्ष विदेशी पर्यटकांनी भारताला भेट दिली. भारतातील संस्कृती अनुभवणे हे भारतभेटीचे प्रमुख आकर्षण विदेशी पर्यटकांमध्ये आहे. पर्यटन हा असा व्यवसाय आहे जो पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गसौंदर्याने नटलेली, स्वच्छ आणि सुंदर पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी पर्यटक नेहमीच उत्सुक असतात; परंतु अति पर्यटन, काँक्रिटीकरण, पर्यटन स्थळांवरील अस्वच्छता, अन्न, आणि सुविधांचा अपव्यय यामुळे पर्यटन व्यवसायास हानी पोहोचत आहे आणि पर्यटन स्थळांची दुरावस्था होत आहे. पर्यटन व्यवसायामध्ये शाश्वत उपभोग व उत्पादनाला चालना देण्यासाठी शाश्वत विकास ध्येयांचा पर्यटन व्यवसायात समावेश करण्यात आला आहे. जी 20( ग्रुप ऑफ ट्वेंटी )ची शिखर परिषद 23 सप्टेंबर 2023 रोजी भारतामध्ये पार पडली. या 18 व्या शिखर परिषदेचे अध्यक्ष पद भारताने भूषविले. जी 20 परिषदेमध्ये पर्यटन व्यवसायाद्वारे शाश्वत विकासाची ध्येय प्राप्त करण्यासाठीच्या विविध पैलूंबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार, शाश्वत विकासाच्या संपूर्ण 17 ध्येयांमध्ये योगदान देण्याची क्षमता पर्यटन व्यवसायामध्ये आहे. शाश्वत विकास ध्येय 8, 12, व 14 मध्ये पर्यटन व्यवसाय आपले विशेष योगदान देऊ शकतो.2030 पर्यंत रोजगार निर्माण करणाऱ्या आणि स्थानिक संस्कृती व उत्पादनांना चालना देणाऱ्या योजनांचा पर्यटन व्यवसायामध्ये समावेश करणे हा शाश्वत विकासाच्या उद्दिष्ट प्राप्तीचा एक भाग आहे. भारत सरकारचे पर्यटन मंत्रालय 'ट्रॅव्हल फॉर लाईफ' या उपक्रमा अंतर्गत शाश्वत पर्यटनाला चालना देणाऱ्या विविध योजना हाती घेत आहे. शाश्वत पर्यटन ही काळाची गरज आहे, त्यासाठी पर्यटन उद्योगातील प्रत्येक भागधारकांनी प्रयत्न करणे अनिवार्य आहे. शाश्वत पर्यटनाद्वारे शाश्वत विकासाची उद्दिष्ट प्राप्त करण्यामध्ये पर्यटन व्यवसाय आपले योगदान देऊ शकतो.*

***सूचक शब्द - शाश्वत विकास, शाश्वत विकास ध्येय, शाश्वत पर्यटन, शाश्वत उपभोग, ट्राव्हल फॉर लाइफ***

**प्रस्तावना:**

2023 मध्ये चीनला मागे टाकून भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला आहे. लोकसंख्या वाढीमुळे रोजगाराची मागणी वाढत आहे. बेरोजगारांना रोजगार पुरवला गेला नाही तर त्याचे सामाजिक, आर्थिक व राजकीय दुष्परिणाम दिसून येतात. अतिरिक्त लोकसंख्येचा ताण देशातील नैसर्गिक साधन संपत्तीवर पडत आहे. वायू प्रदूषण, कचऱ्याचे व्यवस्थापन, पाण्याची वाढती टंचाई, जमिनीतील पाण्याचे प्रमाण कमी होणे, जलप्रदूषण, जंगलतोड, आणि जैवविविधता नष्ट होणे या भारताला भेडसावणाऱ्या काही प्रमुख पर्यावरणीय समस्या आहेत. त्याचबरोबर, वाढत्या लोकसंख्येच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण इत्यादी गरजा पूर्ण करण्याचे आव्हान देखील भारतासमोर आहे. रोजगार निर्मितीसाठी कृषी, उद्योग, व सेवा क्षेत्र यांचा विकास

होणे आवश्यक आहे; परंतु हा विकास करत असताना नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होता कामा नये. कारण असे झाले तर भावी पिढीला संसाधने उपलब्ध होणार नाहीत. यासाठी शाश्वत विकास ही संकल्पना महत्त्वपूर्ण आहे. शाश्वत विकासाद्वारे भावी पिढीच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा न पोचता, म्हणजे उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीला हानी न पोहोचवता, वर्तमान काळातील गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक उद्योगाने शाश्वत विकासाच्या धोरणाचा अवलंब करणे गरजेचे आहे. पर्यटन व्यवसाय देखील त्याला अपवाद नाही. 2022 मध्ये राष्ट्रीय पर्यटन धोरणाचा मसुदा तयार करण्यात आलेला आहे. यानुसार, शाश्वत, जबाबदार आणि सर्वसमावेशक पर्यटनाला चालना देणे व पर्यटनाचा सामाजिक, पर्यावरणीय, आणि आर्थिक पैलूंवर होणारा नकारात्मक प्रभाव कमी करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शाश्वत पर्यटनाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता पर्यटन क्षेत्रातील सर्व भागधारकांना एकत्र आणण्याचे ध्येय या मसुद्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे पर्यटकांना आज घरबसल्या जगातील सर्व पर्यटन स्थळांबाबत माहिती मिळत आहे. भारत जगाच्या दृष्टीने शाश्वत पर्यटनाचे केंद्र व्हावे यासाठी भारत सरकार प्रयत्न करत आहे.

UNWTO (United Nations World Tourism Organization) द्वारे 6 जून 2018 रोजी "विकासासाठी पर्यटन" हा दोन खंडांचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. हा अहवाल शाश्वत विकासातील पर्यटन व्यवसायाची भूमिका स्पष्ट करतो. या अहवालात पर्यटन व्यवसायाचे शाश्वत विकासाचा चालक म्हणून वर्णन केले आहे. हा अहवाल शाश्वत विकासाच्या ध्येय 8, 12 आणि 14 मध्ये पर्यटन व्यवसायाने आपले जास्तीत जास्त योगदान देऊ शकतो यावर प्रकाश टाकला आहे. भारत देखील UNWTO चा सदस्य आहे आणि भारताने शाश्वत विकासाचे धोरण स्वीकारले आहे. भारताच्या शाश्वत विकासामध्ये पर्यटन व्यवसायाच्या भूमिकेचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनात शाश्वत विकास ध्येय 8, 12 आणि 14 यामध्ये योगदान देण्यासाठी भारत सरकारच्या पर्यटन विभागाद्वारे घेण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा व ध्येयांचा अभ्यास करणे.
2) भारताच्या शाश्वत विकासामध्ये पर्यटन उद्योगाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
3) शाश्वत विकासाची ध्येय प्राप्त करण्यासाठी भारत सरकारद्वारे पर्यटन व्यवसायामध्ये घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. पर्यटन विषयक शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, प्रकाशित व अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथाद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे. भारत पर्यटन मंत्रालयाद्वारे सादर करण्यात येणाऱ्या वार्षिक अहवालांमधून तथ्य संकलित करण्यात आले आहेत. आंतरजालाच्या माध्यमातून देखील आंतरराष्ट्रीय शाश्वत विकास अहवालातील तथ्य संकलित करण्यात आले आहेत. उपलब्ध तथ्यांचे वर्गीकरण व त्यांची मांडणी करण्यात आली आहे. नमूद केलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्षांची नोंद करण्यात आली आहे.

**गृहीतके :**

1) भारताच्या शाश्वत विकासाचे ध्येय प्राप्तीमध्ये पर्यटन व्यवसायाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

2) पर्यटन मंत्रालय शाश्वत पर्यटनाला चालना देण्यासाठी उपाययोजना करत आहे.
3) शाश्वत पर्यटन ही काळाची गरज आहे.

**शाश्वत विकास संकल्पना:**

शाश्वत विकास यात 'शाश्वतता" आणि 'विकास" अशा दोन संज्ञा आहेत. शाश्वतता म्हणजे चिरकाल टिकणे आणि विकास म्हणजे गुणवत्तापूर्ण वाढ होय. मानव आणि परिसंस्था यांच्यातील संतुलन टिकवण्यासाठी ही संज्ञा विचारात घेतली जाते. आर्थिक वाढीचा पाठपुरावा करताना बहुतेक विकसनशील आणि अविकसित अर्थव्यवस्थांनी प्रगतीच्या इतर मापदंडाकडे दुर्लक्ष करून सकल देशांतर्गत उत्पन्न वाढ (जीडीपी) आणि शेअर बाजाराच्या कामगिरीवर प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले आहे. तथापि, जीडीपी वाढ ही आर्थिक क्षमता आणि विकासाच्या वास्तविकतेचे सर्वसमावेशक प्रतिनिधित्व करत नाही. विकासाबरोबरच आजूबाजूचा निसर्ग, वातावरण आणि समाजाचे सशक्तिकरण करण्याकडे दुर्लक्ष झाल्यास मानवाचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे विकासाच्या प्रक्रियेमध्ये आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय घटकांवर होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी शाश्वत विकासाची संकल्पना विचारात घेणे आवश्यक आहे.

**1987 ब्रुटलँड कमिशन:**

"भविष्याच्या क्षमतेशी तडजोड न करता सध्याच्या पिढीची गरज भागवणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय."

विकास हा सर्वसमावेशक असावा. समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची समान संधी मिळायला हवी. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या ऱ्हासास कारणीभूत ठरणारा विकास समाजाला हितावह ठरणार नाही. या दृष्टीने जागतिक पातळीवर शाश्वत विकासासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत.

सप्टेंबर 2015 मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत शाश्वत विकासासाठी 17 शाश्वत विकास उद्दिष्टे ठरविण्यात आलेली आहेत. 'Living no one behind' (कोणालाही मागे न ठेवता) या तत्त्वावर ही उद्दिष्टे आधारित आहेत.

**शाश्वत विकासाची ध्येये:**

- गरीबी निर्मूलन
- शून्य भूक
- चांगले आरोग्य आणि कल्याण
- गुणवत्तापूर्ण शिक्षण
- लैंगिक समानता
- स्वच्छ पाणी आणि स्वच्छता
- परवडणारी आणि स्वच्छ ऊर्जा
- योग्य काम आणि आर्थिक वाढ
- उद्योग, नवोपक्रम आणि पायाभूत सुविधा
- विषमता कमी करणे
- शाश्वत शहरे आणि समुदाय
- जबाबदार उपभोग आणि उत्पादन
- हवामान कृती
- पाण्याखालील जीवन
- जमिनीवरील जीवन
- शांतता, न्याय, आणि मजबूत संस्था
- ध्येयासाठी भागीदार



**भारतातील पर्यटन व्यवसाय:**

भारतामध्ये भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधता आहे. भारतातील ऐतिहासिक स्थळे हे कायमच पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरलेले आहेत. प्रत्येक देशामध्ये सामूहिक पर्यटन आणि विशेष पर्यटन असे दोन प्रकारचे पर्यटन असतात. भारतात ताजमहल, कोणार्क सूर्य मंदिर, आणि एलोर लेणी ही ठिकाणे सामूहिक पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. विशेष पर्यटनामध्ये वैद्यकीय पर्यटन हा पर्यटन प्रकार भारतामध्ये लोकप्रिय होत आहे. विदेशी नागरिकदेखील वैद्यकीय पर्यटनासाठी भारताची निवड करतात. केरळ हे भारतातील आयुर्वेदिक वैद्यकीय पर्यटनाचे केंद्रस्थान आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये पर्यटन क्षेत्राचे योगदान लक्षणीय आहे.

**तक्ता क्र.1.1: भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये पर्यटन क्षेत्राचे योगदान**

| वर्ष | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय उत्पन्नतील वाटा टक्केवारी मध्ये | 5.03 | 5.01 | 5.18 | 1.50 | 1.77 |
| प्रत्यक्ष | 2.61 | 2.61 | 2.69 | 0.78 | 0.92 |
| अप्रत्यक्ष | 2.42 | 2.40 | 2.49 | 0.72 | 0.85 |

**स्रोत पर्यटन मंत्रालय भारत सरकार(वार्षिक अहवाल 2023-24)**

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात पर्यटन क्षेत्राचे योगदान वाढत आहे. 2017-18 मध्ये ते 5.03 इतके होते. 2018-19 मध्ये 5.01 आणि 2019-20 मध्ये 5.18 अशी वाढ होताना दिसत आहे. मात्र 2020-21 आणि 2021-22 या आर्थिक वर्षांमध्ये कोरोना निर्बंधांमुळे पर्यटन व्यवसायात उत्पन्न कमी झाले होते. आता मात्र अर्थव्यवस्था पुन्हा पूर्ववत होताना दिसत आहे. पर्यटन व्यवसायाने नवीन उभारी घेतली आहे. पर्यटन क्षेत्रातील भविष्यातील संधी ओळखून भारत सरकार पर्यटनाला गती देण्यासाठी अनेक योजना हाती घेत आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाद्वारे ‘स्वदेश दर्शन’ही योजना 2014 मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत पर्यटन व्यवसायास आवश्यक असणाऱ्या सुविधांची पूर्तता करण्यासाठी 76 प्रोजेक्ट हाती घेण्यात आले.

2017 मध्ये भारत हा धार्मिक लोकांचा देश आहे. भारतातील प्रमुख तीर्थक्षेत्रांना भारतातील तसेच विदेशातील पर्यटक भेट देत असतात. 2017 मध्ये तीर्थक्षेत्रांसाठी ‘प्रसाद’( PRASAD-Pilgrimage Rejuvenation and Spiritual Augmentation Drive.)ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत 26 राज्यांमध्ये 46 नवीन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन, जबाबदार पर्यटन या पर्यटन प्रकारांसाठी देखील भारत सरकार अनेक धोरणात्मक निर्णय घेत आहे. भारतातील पर्यटन व्यवसाय प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पर्यटन व्यवसायाची भूमिका लक्षात घेणे महत्त्वपूर्ण आहे.

**शाश्वत विकासाची ध्येय व पर्यटन व्यवसाय**

पर्यटन हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. परकीय चलन आणि रोजगाराचा महत्त्वाचा स्त्रोत आहे आणि देशांच्या, विशेषत: विकसनशील देशांच्या, पर्यावरणीय, सामाजिक, आर्थिक कल्याणाशी पर्यटनाचा जवळचा संबंध आहे. देशाच्या शाश्वत विकासासाठी पर्यटन व्यवसायामध्ये शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यासाठी भारत सरकारने शाश्वत पर्यटन

धोरण अवलंबले आहे. शाश्वत पर्यटन ही काळाची गरज आहे.

UNWTO (United Nations World Tourism Organization) जागतिक पर्यटन संघटना, "अभ्यगत, उद्योग, पर्यावरण आणि यजमान समुदायांच्या गरजा पूर्ण करणारे, सध्याचे आणि भविष्यातील आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय प्रभावांचा संपूर्ण विचार करणारे पर्यटन म्हणजे शाश्वत पर्यटन."

भारतीय युवकांना शाश्वत पर्यटन व शाश्वत विकासाच्या मोहिमेमध्ये समाविष्ट करण्याच्या उद्देशाने, पर्यटन मंत्रालयाने 40,000 हून अधिक युवा पर्यटन क्लब स्थापन केले आहेत. हे क्लब भारतातील पर्यटनाच्या संभाव्यतेबद्दल तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि जबाबदार व शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी व्यासपीठ म्हणून काम करतात. युवा पर्यटन क्लब, वाइब्रंट विलेज, ट्राव्हल फॉर लाइफ या योजनांतर्गत अनेक उपक्रम शाश्वत पर्यटनासाठी राबवले जात आहेत. पर्यटन स्थळ स्वच्छता मोहीम, निबंध लेखन, स्थानिक यात्रा इत्यादीद्वारे शाश्वत पर्यटनाबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पर्यटन व्यवसायाची साधन म्हणून भूमिका लक्षात घेणे गरजेचे आहे. शाश्वत विकासाच्या सर्व उद्दिष्टांमध्ये प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे योगदान देण्याची क्षमता पर्यटन व्यवसायामध्ये आहे. परंतु शाश्वत विकास उद्दिष्ट 8, 12 व 14 मध्ये पर्यटन व्यवसाय विशेष योगदान देऊ शकतो.

**शाश्वत विकास ध्येय 8: चांगल्या दर्जाचे काम आणि आर्थिक वाढ:**

पर्यटन जागतिक आर्थिक वाढीच्या प्रेरक शक्तींपैकी एक आहे. सध्या जगभरातील 11 पैकी 1 रोजगार पर्यटन क्षेत्रातून उपलब्ध होत आहे. पर्यटन क्षेत्रामध्ये कुशल आणि अकुशल सर्व प्रकारच्या मानवी संसाधनांना रोजगार उपलब्ध होतो. भारतातील रोजगार निर्मितीमध्ये पर्यटन क्षेत्राचे योगदान वाढत आहे.

स्टार्टअप इंडिया कडील माहितीनुसार प्रवास आणि पर्यटन उद्योगात 1900 पेक्षा जास्त स्टार्टअप्स आहेत, ज्यामध्ये कंपन्यांचा समावेश आहे, ज्या प्रवासाचे नियोजन आणि बुकिंग सक्षम करतात तसेच प्रवास सेवा पुरवतात. भारतातील रोजगार निर्मितीमध्ये पर्यटन क्षेत्राचे योगदान तक्ता क्र. 1.2 मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र1.2: भारतातील रोजगार निर्मितीमध्ये पर्यटन क्षेत्राचे योगदान**

| वर्ष | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 |
|---|---|---|---|---|---|---|
| रोजगारातील वाटा (%मध्ये | 14.78 | 14.87 | 13.50 | 12.91 | 12.66 | 12.57 |
| प्रत्यक्ष (%) | 6.44 | 6.48 | 5.89 | 5.63 | 5.52 | 5.48 |
| अप्रत्यक्ष (%) | 8.34 | 8.39 | 7.61 | 7.28 | 7.14 | 7.09 |

**स्रोत पर्यटन मंत्रालय भारत सरकार(वार्षिक अहवाल 2023-24)**

पर्यटन मंत्रालयाद्वारे प्रदर्शित केलेल्या वार्षिक अहवाल 2023-24 नुसार पर्यटन उद्योगाचा रोजगारामधील वाटा 12.57 इतका होता. पर्यटन क्षेत्रामध्ये रोजगार मिळवण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य आणि शिक्षण प्राप्त करण्यासाठी भारत सरकारद्वारे संस्थांची स्थापना करण्यात आली आहे.

**नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ वॉटर स्पोर्ट्स, गोवा:**

या संस्थेमध्ये विविध प्रकारच्या वॉटर बोट चालवण्याच्या प्रशिक्षणापासून वॉटर स्पोर्ट्स जसे की वॉटर स्कीइंग, कायकिंग इत्यादींवर प्रशिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध आहे.

**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट (IITTM):**

भारतीय पर्यटन मंत्रालयाद्वारे 1983 मध्ये या संस्थेची स्थापना झाली. ही संस्था पर्यटन व्यवसायाला आवश्यक असणारे प्रभावी मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देते.

**नॅशनल हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग इन्स्टिट्यूट:**

या संस्थेची स्थापना 1982 मध्ये भारत सरकारद्वारे करण्यात आली. या संस्थेमध्ये पर्यटन व्यवसायामध्ये आवश्यक असणारे रोजगारभिमुख शिक्षण दिले जाते, जसे की डिप्लोमा इन फ्रंट ऑफिस ऑपरेशन, डिप्लोमा इन हाऊसकीपिंग, डिप्लोमा इन बेकरी अँड कॉन्फेक्शनरी इत्यादी. पर्यटन स्थळांवरील सुविधा पुरवणारे बहुतांश लोक स्थानिक असल्यामुळे स्थानिक जनतेला रोजगार उपलब्ध होतो. यामुळे रोजगार व उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक वाढ होते.

भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाद्वारे "हुनर से रोजगार तक" या योजनेअंतर्गत पर्यटन आणि आदरतिथ्य उद्योगाशी निगडित रोजगारक्षम कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये कमी कालावधीचे 160 ते 700 तासांचे 20 कोर्स उपलब्ध आहेत, ज्यामध्ये मल्टीकुजन कुक, फ्रंट ऑफिस, होम डिलिव्हरी बॉय इत्यादी कोर्सेसचा समावेश आहे.

**शाश्वत विकास ध्येय 12: उपलब्ध साधनांचा जबाबदारपूर्वक वापर:**

शाश्वत उपभोग आणि उत्पादन पद्धतीचा अवलंब करणारे पर्यटन क्षेत्र जागतिक स्तरावर शाश्वततेच्या दिशेने बदल घडून आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते असे करण्यासाठी लक्ष 12 मधील मुद्द्यांमध्ये निर्धारित केल्याप्रमाणे, शाश्वत पर्यटनासाठी उपक्रम विकसित करणे आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, जे रोजगार निर्माण आणि स्थानिक संस्कृती व उत्पादनांना प्रोत्साहन देतात . प्रदूषण, जैवविविधता आणि हवामान बदल या आव्हानांना तोंड देण्यासाठी पर्यटन धोरणे आणि पद्धतीमध्ये शाश्वत उपभोग आणि उत्पादनाला गती देणे आवश्यक आहे. संसाधनांचा जबाबदार वापर यामध्ये पर्यटन क्षेत्रामध्ये अन्न आणि कचऱ्याच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी सर्व भागधारकांनी प्रयत्न करायला हवे. पर्यटन क्षेत्राला त्यांच्या अभ्यागतांसाठी मोठ्या प्रमाणात अन्नाची आवश्यकता असते. पर्यटन क्षेत्रातील अन्नाचा अपव्यय बऱ्याच स्थानिक सुविधांवर ताण निर्माण करतो, विशेषतः दुर्गम भागात, जेथे संसाधनांची कमतरता आहे. त्यासाठी या क्षेत्रात शाश्वत अन्न व्यवस्था धोरण राबवणे आवश्यक आहे, ज्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा वापर आणि पर्यटन संबंधित उत्पादन व वापरामुळे होणारा पर्यावरणीय परिणाम कमी होतो. पर्यटन पद्धती आणि उपक्रमांद्वारे शाश्वत विकासासाठी जागरूकता आणि शिक्षणाला प्रोत्साहन देऊन पर्यटन क्षेत्र शाश्वत विकासामध्ये योगदान देऊ शकते. युवा पर्यटन क्लब अंतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे, कारण पर्यटन स्थळांची स्वच्छता ही पर्यटक व स्थानिक लोक या दोघांकरिता देखील महत्त्वपूर्ण आहे. भारत सरकारने सुरू केलेल्या ‘ट्रॅव्हल फॉर लाइफ’ या धोरणाअंतर्गत पर्यटन क्षेत्रामुळे होणारी पर्यावरणाची हानी आपण कशी कमी करू शकतो, त्याचबरोबर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी पर्यटन व्यवसायामध्ये आपण कोणते प्रयत्न करू शकतो याबाबत योजनांचा समावेश केला आहे. ‘ट्रॅव्हल फॉर लाइफ’ तर्गत योजना: १. पाणी वाचवा, २. विज व इंधन वाचवा, ३. स्थानिक व्यवसाय व समाजाच्या सबलीकरणाची जबाबदारी, ४. स्थानिक संस्कृती व

वारसा स्थळांचा आदर करणे, ५. स्थानिक खाद्यपदार्थ खरेदी करण्यास प्रोत्साहन देणे. या संदर्भात विविध योजना आणि आपले योगदान आपण कशाप्रकारे देऊ शकतो याबद्दल माहिती दिली आहे.

**शाश्वत विकास ध्येय 14: पाण्याखालील जीवन:**

सागरी व समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटन हा पर्यटनामधील अतिशय लोकप्रिय प्रकार आहे. समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची नेहमी गर्दी असते. मालदीवसारख्या देशाची अर्थव्यवस्था ही तेथील सागरी पर्यटनावर अवलंबून आहे. परंतु सागरी जीवांचा सागरावर प्रथम हक्क आहे आणि त्यांचे रक्षण करणे हे पर्यटन व्यवसायातील सर्व भागधारकांचे कर्तव्य आहे. CPCB (Central Pollution Control Board) यांनी 2017-18 मध्ये प्रदर्शित केलेल्या अहवालानुसार भारतामध्ये प्रति दिवस 26,000 टन इतके प्लास्टिक जमा होते या मध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे . प्लास्टिक हा सागरी प्रदूषणाचा मुख्य स्त्रोत आहे. प्लास्टिक प्रदूषण हे जमीन, गोडे पाणी आणि सागरी परिसंस्थेवर परिणाम करते. हे जैवविविधतेचे नुकसान व परिसंस्थेच्या नुकसानाचे प्रमुख कारण आहे आणि हवामान बदलास देखील हातभार लावते. त्यामुळे प्रामुख्याने प्लास्टिकचे उत्पादन व वापर कमी करण्यासाठी कठोर नियम योजना करणे अत्यावश्यक आहे.

भारताच्या जहाज बांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या 'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर, स्वच्छ किनारा, सुरक्षित समुद्र' या उपक्रमांतर्गत उरण येथील हिरवाड बीचवर स्वच्छता मोहीम राबवली होती. या मोहिमेमध्ये विभागांच्या अधिकाऱ्यांसह 75 कामगार सहभागी झाले होते. त्यांनी पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिकच्या पिशव्या आदी सुमारे दोन टेम्पो कचरा जमा करून त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली. ट्रॅव्हल फॉर लाईफ. या उपक्रमामध्ये देखील प्लास्टिक वापर टाळण्याबाबत योजना करण्यात आलेल्या आहेत.

**निष्कर्ष:**

भारताची वेगाने वाढणारी लोकसंख्या, लोकसंख्येचा नैसर्गिक साधन संपत्तीवर येणारा ताण आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी शाश्वत विकास धोरण हे भारतासह जगातील सर्वच देशांसाठी आवश्यक आहे. प्रत्येक उद्योगाने व्यवसाय करताना शाश्वत विकासाचे ध्येय लक्षात घेऊन जबाबदारीने व्यवसायातील निर्णय घेणे आवश्यक आहे.

शाश्वत विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.पर्यटन व्यवसायामध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक भागधारकाने, जसे की पर्यटक, पर्यटन संस्था, पर्यटकांना सुविधा पुरवणारे हॉटेल व्यवसायिक, स्थानिक व्यापारी आणि शासन, शाश्वत पर्यटनासाठी आपले योगदान देणे आवश्यक आहे. भारत सरकारद्वारे पर्यटन मंत्रालय अंतर्गत शाश्वत पर्यटन विभाग सुरू करण्यात आला आहे. या विभागामध्ये शाश्वत पर्यटनाचे प्रयोग आणि त्यांचे यश, तसेच शाश्वत पर्यटनासाठी कोणकोणत्या योजना पर्यटनामध्ये समाविष्ट केल्या जाऊ शकतात याची माहिती दिली आहे. कृषी पर्यटन, ग्रामीण पर्यटन, जबाबदार पर्यटन अशा पर्यटन प्रकारांमध्ये सहभागी होण्यासाठी पर्यटकांना प्रवृत्त केले पाहिजे.

स्वच्छ पर्यावरण, पाण्याचे स्त्रोत, स्वच्छ समुद्र किनारे, समान संधी, सुशिक्षित व सुदृढ समाज ही आपल्या येणाऱ्या पिढीला आवश्यक असणारी सर्वात मोठी भेट आहे. शाश्वत विकासाचे पालन करून आपण ती भेट पुढील पिढीला देऊ शकतो, याचे भान समाजातील प्रत्येक घटकाने ठेवले तर शाश्वत विकास साध्य करणे अशक्य राहणार नाही.

**संदर्भ:**

1) Batia, R.N. (2000). Tourism and the Environment: A Quest for Sustainability (1st Ed). New Delhi: Indus Publishing Company.
2) YES, BANK and CII. (2017). Sustainable Tourism in India - Initiatives & Opportunities. Retrieved November 23, 2019, from https://www.yesbank.in.
3) Hunter, C. J. (1995). On the need to re-conceptualise sustainable tourism development. Journal of sustainable tourism, 3(3), 155-165
4) Kaul, H. and Gupta, S. (2009), "Sustainable tourism in India", Worldwide Hospitality and Tourism Themes, Vol. 1 No. 1, pp. 12-18. https://doi.org/10.1108/17554210910949841
5) Streimikiene, D., Svagzdiene, B., Jasinskas, E., & Simanavicius, A. (2021). Sustainable tourism development and competitiveness: The systematic literature review. Sustainable development, 29(1), 259-271
6) www.tourisum.gov.in
7) www.sustainabletourisum.in
8) info@unwto.org